# एडमंड स्पेन्सर व वॉल्टर रॅले

**ज्योतिर्मय साहित्य**

एडमंड स्पेन्सर व वॉल्टर रॅले या दोघांचे व त्यांच्या विषयी खूप लिखाण उपलब्ध आहे. अल्प माहिती माझ्या वाचनात आली.

एडमंड स्पेन्सर यांचा जन्म १५५२ लंडन येथे. त्यांचे फेअरी क्विन हे काव्य १५९० मध्ये प्रसिद्ध झाले. अप्रकाशित असताना त्यांनी ते वॉल्टर रॅले यांना आयर्लंडच्या वास्तव्यात (१५८९) दाखविले होते. ते या काव्यामुळे खूप प्रभावित झाले व त्यांच्या आग्रहामुळे हे काव्य राणी एलिझाबेथ प्रथम यांच्या पर्यंत पोंहोचले.

त्यानंतर फेअरी क्विन चे तीन भाग प्रकाशित झाले. त्याबरोबरच स्पेन्सर यांना पन्नास पौंडाची पेन्शन मंजूर करण्यात आली व त्यांना कवी म्हणून मान्यता मिळाली. रॅले व स्पेन्सर या दोघा विषयी सविस्तर लिहायचे योजले नाही.

माझ्या खालील कवितेत वॉल्टर रॅले यांच्याविषयी कांही माहिती आली आहे, तेवढी देत आहे.

(वॉल्टर रॅले और कविता'' (अंश))

खडे थे सामने वॉल्टर रॅले,
मुझ से चार सौ साल बडे रॅले जी,
बहुत आदर मन में आपका,
कैसे लडे बन सैनिक, नेता, लेखक और
कवि, हुए सन्मानीत पहली एलिजाबेथ से,
खोज करने भेजें साथी उत्तर अमेरिका।
लेकिन कैसे चुपके से की शादी
और भूगती सजा साथ,
फिर की यातायात ढूंढने सोने का शहर,
हुए शामिल षडयंत्र राजा के विरुद्ध,
हुयी सजा छुटे भी और लडे शत्रू से,
निडर जब अपनों ने किया सिर अलग।

१५८९ मध्ये फेअरी क्विन चे तीन भाग स्पेन्सर यांनी लिहिले होते. रॅले यांनी ते वाचनाचा आग्रह धरला. ते काव्य त्याना खूप आवडले.

त्या नंतर रॅलेंनी स्पेन्सर यांची लंडनला राणी एलिझाबेथ प्रथम यांची भेट घडवून आणली. याची साक्ष लुडोविक ब्रयस्टेक यांच्या ए डिसकोर्स ऑफ सिव्हिल लाईफ यात आढळते.

परंतू माझा उद्देश विल्यम फ्रीमॅन यांनी दोघांच्या (स्पेन्सर व रॅले) भेटीचे काल्पनिक परंतू वास्तव वाटणारे जे लिखाण केले आहे, त्याविषयी लिहीणे हा आहे.





लाकडी छत असलेल्या खोलीत स्पेन्सर व रॅले बसले होते. तेथून बाग दिसत होती. सौम्य उबदार प्रकाश पसरला होता. मागच्या बाजूला डोंगर उतारावर दाट झाडी होती. समोर एक छोटे तळे होते. ऑक्टोबर महिना होता पलिकडे मॅलो व लिमेरिक या ऐतिहासिक शहरांना जोडणारा रस्ता होता.

दोघे गुणवान होते. दोघांच्या दिसण्यात साधर्म्य होते. दोघांना टोकदार दाढी होती. उच्चभ्रू लोकांसारखेच त्यांची वस्त्रे होती. दोघे सदतीस वर्षाचे होते. दोघे दूरदृष्टी असलेले स्वप्न पहाणारे व त्यासाठी झोकून देणारे होते. रॅले राणी एलिझाबेथ प्रथम चे प्रमुख अंगरक्षक होते. ते चाळीस हजार एकर जमिनीचे मालक होते. अमेरिकेत वसाहत स्थापन करण्याची कल्पना व प्रत्यक्ष पुढाकार त्यांचाच. जेम्स राजाच्या कारकीर्दीत त्यांचा शिरच्छेद करण्यात आला.

एडमंड स्पेन्सर उदास वाटत होते. जवळपास तासभर ते दोघे राजकारण आणि युद्धाबद्ल बोलत होते.दरबारातील लोकाविषयी बोलत होते.स्पॅनिश सैन्याची माघार इ. विषयी बोलत असता तंबाखू मुळे उत्तेजित होऊन स्मित हास्य करीत स्पेन्सर यांनी त्यांचे फेअरी क्विन काव्य रॅले यांना दाखवले. योग्य अनुकूल वातावरणात त्यांनी कवितेचे पहिले पान उघडले.

'' वॉल्टर (रॅले), नऊ वर्षं आधी पासून हे काव्य लिहायचे माझ्या मनात होते.'' इति स्पेन्सर.

''वाचा , मी वाट पहात आहे''

'' फेअरी क्विन वाचण्यापूर्वी या खोलीत धूम्रपानाचा धूर नको'' स्पेन्सर.

''बघ, माझ्या चिलिम मध्ये तंबाखू नाही तर फक्त राख शिल्लक आहे'' वॉल्टर.

स्पेन्सर यांनी फेअरी क्विन चे पहिले पान वाचायला सुरुवात केली.



अशोक जवळेकर,
डोंबिवली (प). जि. ठाणे.
9892045737.

वाचनाच्या आणि ऐकण्याच्या तल्लीनतेत संध्याकाळ झाली. सूर्य मावळला. पक्ष्यांचा चिवचिवाट थांबला. दूर कुणीतरी आयरिश अंगाई गात असल्याचे ऐकू येऊ लागले. अंधार झाला.

स्पेन्सर यांनी वाचन थांबवले असते, परंतू रॅले पुढे वाचनाचा आग्रह करीत राहीले. दिवे आणले. नंतरही अजुन काही पाने वाचावयाची होती.

''तुम्ही माझ्या सोबत इंग्लंडला चलावे'' रॅले म्हणाले.

''तुमचे हे उच्चतम लिखाण राणी एलिजाबेथ यांच्या चरणी रुजू केले नाही तर मी राणीचा विश्वासघात केला असे होईल. तुम्ही असामान्य कर्तृत्व असलेले आहात. आपले देशवासी तुमचा सत्कार करतील आणि ईश्वराला धन्यवाद देतील.''

साहसी रॅले व कवी स्पेन्सर साउथ हॅम टन येथून निघाले.

राणी एलिझाबेथ यांची अनेक दरबाऱ्यावर कृपादृष्टी असे. पण काही कारणाने मर्जी बिघडली तर कैद, हद्दपारी किंवा मृत्यू असे.

राणी एलिझाबेथ प्रथम कडून रॅले व स्पेन्सर यांना दरबारात बोलावले जाते.

'' सर वॉल्टर, कोणते काम आहे?'' राणी एलिझाबेथ यांनी थोड्या रुक्ष आवाजात विचारले.

रॅले यांनी थोडक्यात सांगितले. स्पेन्सर यांची ओळख करुन देण्याची गरज नव्हती. त्यांचा दरबारातील लोकांशी परिचय होता. ते राणीचे नोकर होते. परंतू राणी समक्ष इतर दरबारी असताना काय बोलावे हे त्यांना सुचत नव्हते.

स्पेन्सर यांना पुन्हा दोन दिवसानंतर बोलावले जाते. राणी एलिझाबेथ यांना फेअरी क्विन ही रचना तेजोमय वाटते. बुद्धीमान आणि संस्कृती संपन्न असल्याने त्या फेअरी क्विन चे वैभव ओळखतात. स्पेन्सर यांना ५० पेन्शन मंजूर होते.

हे सर्व विल्यियम फ्रीमन चे लिखाण वास्तव वाटते आपण वाचत जातो.

वॉल्टर रॅले सारखा लेखक, योद्धा आणि एडमंड स्पेन्सर सारखा आयर्लंड च्या लोकांशी क्रूरपणे वागावे अशा मताचा असलेला कवी यांची झालेली भेट आपल्याला शहारुन टाकते.

शेवटी ही फ्रीमन यांची कल्पनेतील भेट आहे हे समजते. तरी ते सर्व समकालीन होते. हे खरे आहे की फेअरी क्विन राणी एलिझाबेथ पर्यंत पोहोचवणे व स्पेन्सर यांना पेन्शन मिळण्यासाठी वॉल्टर रॅले यांनी प्रयत्न केले. स्पेन्सर यांनी सुद्धा चांगली कामगिरी केली.

# प्रबोधनाचा जागर ....सहयोग गणेश मंडळाचा अनोखा उपक्रम

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - सहयोग नगर, उल्कानगरी, गारखेडा परिसरातील सहयोग गणेश मंडळाने यंदा गणेशोत्सवाला एक वेगळेच वळण दिले. देखावे आणि मिरवणुकांपलीकडे जाऊन विचारांचा जागर घालणारी भव्य प्रबोधनात्मक काव्यमैफिल मंडळाने दिनांक २३/०९/२०२६ रोजी आयोजित केली होती.ही मैफिल बुधवारी सायंकाळी रसिकांच्या प्रचंड प्रतिसादात उत्साहात संपन्न झाली.

गणरायाच्या आरतीनंतर सुरु झालेल्या या शब्दांच्या मैफिलीने उपस्थित प्रत्येकाच्या काळजाचा ठाव घेतला. कधी आईच्या मायेची ऊब देणारी कविता, तर कधी बाप आणि लेकीच्या नात्याची वीण उलगडणारी रचना, कधी शेतकऱ्याच्या बांधावरच्या बुजगावण्याची व्यथा तर कधी बायको असते भारी म्हणत हास्याचे फवारे उडवणारी विनोदी फटकेबाजी - या मैफिलीत सर्वच भावभावनांचा संगम पाहायला मिळाला.

श्री दिपक नागरे यांनी आई आणि बहीण या नात्यांवर हळुवार भाष्य करताना रोबोट होत चाललेल्या शाळांवर परखड भाष्य केले आणि आपल्या विनोदी शैलीने उपस्थितांना खळखळून हसवले. सौ. सुनिता कपाळे यांनी काहूर, बाप, हिरवा चुडा आणि पुन्हा एकदा आई या रचनांतून स्त्री मनातील भावविश्व,



कुटुंबाची ओढ आणि संघर्ष अतिशय ताकदीने मांडला.

श्री आर. पी. शिखरे यांनी निसर्गाशी असणारे आपले नाते जोडण्याचा प्रयत्न केला. लेक या कवितेतून आई आणि बापाच्या हृदयाला स्पर्श करून नेत्रांच्या गंगेला वाट मोकळी करून दिली, संग प्रीतीचा मधून पती-पत्नीच्या प्रेमाची महती सांगितले, वार वारंवार केले या कवितेतून समाजाच्या हृदयाच्या तारा छेडल्या. श्री विजयकुमार पांचाळ यांनी खेड्याकडे चला ची हाक देत मातीशी नाते जोडण्याचा संदेश दिला. भक्षक या रचनेतून समाजातील वाईट प्रवृत्तींवर त्यांनी आसूड ओढला, तर माझं पिल्लू आणि वंशाचा दिवा या कवितांनी पितृत्वाचा गोडवा उलगडला.

तर प्रा. डॉ. सुशिल सातपुते यांनी तो काळ बरा होता म्हणत जुन्या संस्कारांची आठवण करून दिली. बरं झालं बाप्पा या रचनेतून आजच्या राजकीय आणि सामाजिक घडणाऱ्या विदारक वास्तवाचे चित्र उभे केले, भोंदूगिरी आणि बुजगावणं या कवितांमधून अंधश्रद्धा आणि शेतकऱ्यांचे जगणे यावर प्रबोधनात्मक भाष्य करून रसिकांना अंतर्मुख केले.

केवळ कविता नव्हे, तर प्रत्येक कविता हा एक संस्कार होता. ही मैफिल ऐकण्यासाठी आलेला प्रत्येक रसिक मनात एक नवा विचार, एक नवी प्रेरणा घेऊनच घरी परतला. उत्सव म्हणजे केवळ आनंद नव्हे तर समाजाला दिशा देण्याचे माध्यम आहे, हे सहयोग गणेश मंडळाने दाखवून दिले आहे.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहयोगनगरचा राजा मंडळाच्या यांनी प्रयत्न केले, या मैफिलीचे बहारदार संचलन डॉ. सुशील सातपुते यांनी केले

# गानकोकिळा लता मंगेशकर

**ज्योतिर्मय साहित्य**



लता मंगेशकर नुसतं नाव जरी ऐकलं तरी तरी त्यांचे मूर्तीमंत गाण्याचे रूप प्रत्येकाच्या डोळ्यासमोर आल्याशिवाय राहत नाही. त्या साक्षात सरस्वतीचाच अवतार होत्या. त्यांच्या आवाजातून वाणीतून सरस्वतीचाच भास होतो. आपण लता मंगेशकर यांचे गाणे ऐकतच मोठे झालो. त्यांचा बराचसा कालखंड या पिढीने पाहिला ही पिढी खरोखरच भाग्यवान आहे. असा एकही दिवस नसेल की आपण लता मंगेशकर यांचं गाणं ऐकलं नाही. ज्ञानेश्वरांच्या अभंगांना गोडवा मिळाला व ते जनमानसात रुजले ते लता मंगेशकर यांच्या आवाजांनी. दिवसाची सुरुवात रेडिओवरील लता मंगेशकर यांच्या भक्ती गीते व अभंग ऐकतच व्हायची.

लता मंगेशकर यांचे बालपण अतिशय कष्टात गेले. वयाच्या १३ व्या वर्षी वडिलांचे छत्र गेले. त्या वयापासून त्यांनी कुटुंबाची जबाबदारी स्वीकारली. परंतु संगीत व गाण्याचे बाळकडू हे वडिलांपासून उपजतच आलेले होत आणि तेच त्यांच्या उपजीविकेचे साधन झाले. पंडित दीनानाथ मंगेशकर शास्त्रीय गायक होते. त्यामुळे ही लता बहरली ती वडिलांच्या मार्गदर्शनाने व त्यांच्या गाण्याचे रियाजाने. त्यांच्या वडिलांना मात्र त्यांच्या गाण्याची आवाजाची ओळख लहानपणीच जाणवली. वडिलांसोबत त्या गाण्याच्या कार्यक्रमाला जात असतं. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या एका कार्यक्रमात गाणे गायले. ''मंगळागौरी'' या मराठी चित्रपटात त्यांनी अभिनय कला ही दाखवली. मात्र आवड होती ती गाण्याची. ''आनंदघन'' या नावाने त्यांनी संगीत दिग्दर्शनाचेही काम केले. ''साधी राहणी व उच्च विचारसरणी'' हीओळख त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये प्रकर्षाने जाणवते.



सौ. अर्चना जोशी
छत्रपती संभाजीनगर

त्यांनी अनेक भाषांमध्ये गाणे गायली. यांच्या अनेक मराठी व हिंदी गाण्याने सिनेसृष्टीला एक वेगळेच महत्व प्राप्त झाले.

त्यांच्या गायनाचे सगळ्यात वेगळे वैशिष्ट्य कोणते असेल तर गाणे कोणतेही असो भक्ती गीत, भावगीत, प्रेम गीत, गाण्यात किती गहन अर्थ असेल तरीही गातांना त्यांच्या चेहऱ्यावरील भाव हे कायम स्थिरच असायचे. त्यामुळे त्या प्रत्येक गाण्याला न्याय देऊ शकत होत्या. त्यांच्या गायनाची साधना ही अलौकिकच होती. ''आयेगा आनेवाला'' या गाण्यापासून ते ओ पालन हारे या गाण्यापर्यंत प्रत्येक गाण्यांमध्ये एक वेगळी लकब होती.

गाण्याला त्यांनी आपले दैवत मानले होते. त्यांना देव वेगळीकडे शोधण्याची गरज नव्हती. गाण्यातच त्यांनी देव शोधला होता. ''मोगरा फुलला'' या गाण्यातून हे प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या गाण्याची साधना असामान्यच होती.

वेगवेगळ्या ३६ भाषांमध्ये जवळपास ५० हजार गाणी त्यांनी गायली व विदेशातही आपले स्थान निर्माण केले. अशा लतादीदींचा आज जन्मदिवस. त्यानिमित्त हा लेख प्रपंच. ही स्वर कोकिळा आपल्यातून जाऊन चार वर्षे झाले परंतु त्या कायम आपल्या सोबतच आहे, त्या त्यांच्या आवाजाने. त्यांच्या आवाजाने त्या पृथ्वीवर अनंत काळापर्यंत राज्य करतील व येणाऱ्या अनेक पिढ्या त्यांच्या गाण्याने मंत्रमुग्ध होतील. ह्या चराचरात त्यांचा ध्वनी कायम घुमत राहील. त्यांच्या गाण्याने त्या अजरामर झाल्या आहेत. अशा या गानकोकिळेला त्रिवार अभिवादन।

# विश्वात सर्वांत थोर दैवत ''आई''

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

मुख्य म्हणजे त्या काळातील बहुतेक नोकरदार, मध्यमवर्गीयांच्या घरी हीच पद्धत होती. वडीलांना कोणत्यावेळी बोलायचं हे आईला पक्कं माहीत होतं. कारण, त्यावेळी वडील चांगल्या मूडमध्ये असायचे. हे पाहून आई त्यांना नम्रपणे योग्य प्रकारे सांगत असे. त्यानुसार आम्हाला हौसमौजेच्या गोष्टी मिळत असत. त्याही वस्तू फार भारी किंमतीच्या नसतं. तरीही, आम्हाला त्यात ब्रम्हानंद मिळाल्यासारखे वाटत असे. हा आनंद काही वेगळाच होता. तो मन तृप्त करणारा आनंद होता. दिवाळीच्या दोन दिवस आधी वडील मला आणि धाकट्या भावाला सोबत घेवून फटाके खरेदीसाठी फटाक्यांच्या दूकानात घेवून जात असत. त्यांनी सांगितले की,आज आपल्याला संध्याकाळी फटाके आणण्यासाठी

दूकानात जायचे आहे तर आमचा आनंद गगनात मावेनासा होत असे. मग, आम्ही दोघे भाऊ एक एक मोठी पिशवी खांद्याला लावून त्यांच्यासोबत चालत बाजारात जात असू. चार महिने चातुर्मासात आई(वहिनी) रोज पहाटे चार वाजता उठून स्नान करुन शुचिर्भूत होऊन

पहाटे देवाची पूजा करुन ३३ काकड वाती मोठ्या पात्रात ठेवून त्या देवाला ओवाळून चार महिने काकड आरती करीत असे. तसेच, चार आठ दिवस राहायला घरी आलेल्या पाहुण्या रावळ्यांकडे घरातील माणसांसह सगळ्यांकडे

आईचं बारकाईने लक्ष असे. त्यावेळेच्या काळात नात्यांमध्ये खूप आपलेपणाची आपलेपणा, जिव्हाळा होता. नातेवाईक, पाहुणे यांना मुक्कामानंतर सोडण्यासाठी बसस्टँडवर घरातील दोन माणसं तरी जात असत. त्यांना बसमध्ये बसविल्यानंतर बस सुरु झाल्यावर हात हालवून त्यांचा निरोप घेत असत. बसमध्ये बसलेल्या आणि त्यांना सोडायला आलेल्या



माणसांच्या दोघांच्याही डोळ्यांत पाणी येतं असे. असं ते जिव्हाळ्याचं नातं होतं. असा हा जिव्हाळा आईमध्ये होता. तसाच तो तिने इतरांमध्ये ही निर्माण केला होता. ''याला जीवन

ऐसे नाव! '' त्याकाळात चार महिने चातुर्मासात

श्री तिरूपती बालाजी येथील ब्राह्मण मराठवाड्यात उदरनिर्वाहासाठी तसेच, धनधान्यासाठी राहात असतं. ते दरवर्षी हक्काने आमच्याघरी दोन चार दिवस जेवायला येत असत. कधी तीन तर कधी पाच ब्राह्मण सुध्दा जेवायला येत असत. आई पहाटेच उठून

देवपूजा,आन्हिक उरकून स्वयंपाकाला सुरुवात करीत असे. सकाळी अकरा साडेअकरा वाजता

ते सर्व ब्राह्मण घरी येईपर्यंत आईचा (वहिनींचा) सवळ्यातील सर्व स्वयंपाक तयार असे. ते ब्राह्मण आईला त्यांच्या आवडीची भाजी, वांग्याचं भरीत व मसालेदार वरण करण्यासाठी सांगत असत. मग,आईही त्याप्रमाणे त्यांच्या आवडीचे सर्व पदार्थ करीत असे. घरी आल्यावर स्वच्छ हातपाय धुवून ते ब्राह्मण जेवायला बसत असत. पोटभर जेवण झाल्यावर त्यांना यथायोग्य दक्षिणा दिली जात असे. त्यांना नमस्कार केल्यानंतर ते सर्व ब्राह्मण आईला व घरातील सर्वांना शुभाशिर्वाद देत असत. हा रितीरिवाज दरवर्षी चालत असे.

आईच्या (वहिनींच्या) आवाजात खूप गोडवा होता. ती सकाळी भक्तीगीते, विष्णुसहस्रनाम मुखोद्गत असल्यामुळे तोंडाने म्हणत असे. माझ्या वडिलांचं बहुतांशी बालपण हे श्री तुळजाभवानी मातेच्या श्रीक्षेत्र तुळजापूर येथे गेल्यामुळे पहाटेपासून रात्रीपर्यंत देवीच्या पूजेचा दैनंदिन उपक्रम नैवेद्य,आरती तसेच, श्री

तुळजाभवानी मातेच्या नवरात्रातील नऊ दिवस

चालणा-या व दस-याच्या दिवशीचा धार्मिक परंपरेनुसारचा कार्यक्रम त्यांनी नित्य पाहिल्यामुळे त्यांना पुर्णपणे तोंडपाठ झाला होता. श्रीतुळजाभवानी देवीच्या पूजेचं व नवरात्रातील पूजेचं अत्यंत उत्कृष्ट काव्यबद्ध वर्णन वडीलांनी त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उच्चपदस्थ पदावरील निवृत्तीनंतर हे काव्यबद्ध स्तोत्र त्यांनी स्वतः केलं आहे. स्तोत्राच्या सुरुवातीच्या दोन ओळी खालीलप्रमाणे आहेत.

''पाव गे मज पाव गे जगदंबिके। पालके भवतारके भयनाशके अघहारके। चार ओळींचं आठ कडव्याचं हे स्तोत्र आहे. हे स्तोत्र आई व वडील नवरात्रात रोज रात्री विशिष्ट लयीत व मुलांमध्ये म्हणत असत. त्यांच्यासोबत आम्हीही

भावंडे म्हणत असू. नवरात्रातील आईचं मुख्य आवडतं गाणं म्हणजे



मधुकर निलेगावकर, पुणे
मो. 94213 75691

श्री जगदंबामातेचा जोगवा होतं. ''पिठामिठाचा जोगवा या गं बायांनो दरबारी। मला जायचं गुरुवारी गं तुळजापूरच्या बाजारी। तुळजापूरला जाईन. हळदकुंकू वाहीन। खण नारळ घेईन अंबाबाईची ओटी भरुन। लवकर परत मी येईन। हा जोगवा नवरात्रात आई रोज रात्री आवडीने गोड सुरात म्हणत असे. अशी माझी सर्व सद्गुणसंपन्न आई गणेशोत्सवातील अनंत चतुर्दशी लगतच्या पौर्णिमेला मोक्षपदाला गेली.आईची ही एकतिसावी पुण्यतिथी तसेच, जन्मशताब्दी आहे. ईश्वर तिच्या आत्म्याला चिरंतन सुखशांती, समाधान देवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना व दंडवत आहे. आई

गेल्याचे समजल्यावर ज्यांना ज्यांना आईने अन्नदान,वस्त्रदान ,वस्तूदान कानातील सुवर्ण दागिन्यांचे दान केले होते. त्यांना खूप वाईट वाटले होते. तिच्या आठवणी काढून खूप वेळ ते रडत होते. इतका जिव्हाळा व लळा आईने सर्व गरीब लोकांना तसेच, आसपासच्या लोकांना लावला होता. म्हणूनच, म्हणतात '' स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी'' इतका आईचा महिमा तिन्ही लोकांत महान आहे.

जय श्री श्रीकृष्ण! जय श्री स्वामी समर्थ!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559